# शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक
डॉ. नविन केशव सोळंके

ग्लोबल पब्लिकेशन
ISBN 978-81-945997-8-4

...VAJI COLLEGE...

82

ISBN : 978-81-945997-8-4

- **उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती**
  **डॉ. नवीन केशव सोळंके**

© सुरक्षित

- **प्रकाशन क्रमांक 3151**

- **प्रकाशक**
  ग्लोबल पब्लिकेशन
  एल.आय.सी. कॉलनी, लातूर,
  ता. जि. लातूर - 413531.

- **अक्षर जुळवणी**
  श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

- **मुखपृष्ठ**
  श्री. विकास ढमाले

- **मुद्रक**
  इंडोव्हिजन ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
  एल.आय.सी. कॉलनी, लातूर, जि. लातूर

- **प्रथमावृत्ती : 26 जानेवारी 2021**

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अभ्यास **डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे** | १ |
| २ | चल : संशोधनातील एक मापदंड **डॉ. अर्चना के देशमुख** | १२ |
| ३ | गृहितक सिध्दांतावर आधारलेले संशोधन **डॉ. एन. आर. हरगुळे** | १७ |
| ४ | शैक्षणिक संशोधन काळाची गरज **डॉ. एस. एन. मुंढे** | २४ |
| ५ | मानव्य विद्याशाखेतील संशोधन पध्दतीचे स्वरुप आणि दृष्टीकोन **डॉ. मनिषा बाबूराव गवळी** | ३२ |
| ६ | मानव्यविद्या शाखेतील संशोधन पद्धतीतील माहिती संकलनातील समस्या **डॉ. नविन केशव सोळंके** | ४१ |
| ७ | सामाजिक संशोधन आणि वैज्ञानिक अधिष्ठान पध्दती **डॉ. आर.डी. मुक्टे** | ४८ |
| ८ | उच्च शिक्षणातील संशोधनाचे स्वयं मुल्यमापन **डॉ. सुभाष एन. सातव** | ५३ |
| ९ | संशोधन अहवाल लेखनाचा अभ्यास | ५९ |

SHIVAJI COLLEGE • HINGOLI



## प्रकरण ७

# सामाजिक संशोधन आणि वैज्ञानिक अधिष्ठान पध्दती

**डॉ. आर.डी. मुक्टे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

**प्रस्तावना :-**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. जिज्ञासा ही त्याची एक मुलभूत गरज आहे. सामाजिक जीवनात त्याला विविध प्रकारचे अनुभव येत असतात. शास्त्राला कोणत्याही विषयांचे वावडे नसते. जे जे म्हणून मानवाच्या अनूभव कक्षेत येवू शकते ते सर्व शास्त्राचा अभ्यास विषय होऊ शकते. म्हणूननच शास्त्र हे प्रामुख्याने पध्दतीवर आधारलेले असते. संशोधन हा शब्द सर्वसामान्य व्यवहारात प्रचलीत आहे. विविध क्षेत्रातील बौध्दीक आणि व्यवहारीक समस्यांची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आणि प्रयत्न असतो. त्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. संशोधन ही अत्यंत काळजी पुर्वक आणि टीकात्मक स्वरूपाची चौकशी असून त्याद्वारे वस्तूनिष्ठ तथ्थे आणि तत्वे शोधली व काढली जातात. काही तरी निश्चित ज्ञान प्राप्त करण्यासाठी यात जाणीव पुर्वक तपास केला जातो.

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनात संशोधनाचे महत्व फार मोठे आहे. वर्तनान काळात नवीन ज्ञानाची भर घालणे हे संशोधनाचे मुलभूत कार्य आहे. सर्व प्रकारची संशोधने प्रामुख्याने समाज जीवनाशी संबंधीत असतात. मानवी वर्तनूक हाच सामाजिक जीवनाचा आधार असल्यामूळे सामाजिक संशोधनामध्ये १००% अचूकता आणता येत नाही. संशोधन ही ज्ञान प्राप्त करण्यासाठीची वैज्ञानिक पध्दत आहे. शास्त्राचा विस्तार आणि विकास करण्यासाठी





स्वरूप वेगळे असते. आधुनिक काळात प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाचा प्रवेश झाला आहे. मानवी विकासात विज्ञानाच्या योगदानाचे महत्व सर्वसामान्य लोकांना पटत आहे. विज्ञान ही संशोधन, अध्ययनाची एक पध्दती सर्वमान्य आहे. कोणत्याही वस्तू, विषय आणि घटनेचे सर्वांगिण आणि परिपूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करणे अपरिहार्य असते.

**अध्ययनाचा उद्देश :-**

शोधनिबंधाला निश्चित दिशा मिळावी, संशोधन निश्चित हेतू पूर्ती करणारे असावे यासाठी खालील उद्येश निर्धारीत केली आहेत.

१) संशोधन हे ज्ञानसंपादन करण्याचे बौध्दिक प्रक्रियांचा अभ्यास करणे.
२) व्यावहारिक संशोधन हे समस्या सोडविण्याकरीता असते हे जाणणे.
३) इतर संशोधनाच्या दृष्टीने या संशोधनात अपेक्षीत फरक, तफावती, तथ्थ संकलनातील अचूकतेचा आढावा घेणे.

**तथ्थसंकलन :-**

प्रस्तुत शोधकार्यासाठी द्वितीय तंत्राचा वापर करण्यात आला असून संदर्भग्रंथ वर्तमानपत्रे, संदर्भसाहित्य व संगणकाचा वापर करण्यात आला.

**संशोधन म्हणजे काय :-**

स + शोधन या दोन शब्दांनी मिळून संशोधन शब्द बनला .स म्हणजे संपूर्ण ,समग्र असा अर्थ होतो तर शोधन म्हणजे शोध घेणे यावरून एखादया गोष्टीचा संपूर्ण शोध असा अर्थ होतो.

रेडमेन / मोरी :- संशोधन म्हणजे नविन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पध्दतशिर प्रयत्न होय. (Systematic effort to gain new knowledge we call research )मनुष्य हा एक बुध्दीजीवी प्राणी आहे. त्याला प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा जाणून घेण्याची इच्छा असते. त्याची हिच इच्छा व जिज्ञासा हाच संशोधनाचा आधार असतो.

नविन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेल्या पध्दतशीर प्रयत्नांना "संशोधन" असे म्हणतात. नविन तत्वे आणि तथ्थे शोधण्यासाठी तसेच जुनी तत्वे किंवा तथ्थे यांच्या परिक्षणासाठी केलेला चिकित्सक आणि पध्दतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय. नविन ज्ञान संपादन करण्यासाठी तसेच जन्या ज्ञानाचे परीक्षण

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

SHIVAJI COLLEGE HINGOLI



बौध्दीक प्रक्रिया आहे. संशोधनाद्वारे एका बाजूला निसर्गाच्या रचनेची कारणमीमांसा करीत असतो तर दुसऱ्या बाजूस तो सामाजिक घटनांची कारणमीमांसा करीत असतो. सामाजिक घटनांचे शास्त्रीय अध्ययन करुन कार्यकारण संबंध प्रस्तापीत करणे आणि ज्ञानाची व्याप्ती वाढविणे हाच सामाजिक संशोधनाचा उदेश असतो. कोणत्या तरी सामाजिक समस्येच्या सोडवणूकीसाठी केलेले पध्दतशीर आणि शास्त्रीय चिंतन म्हणजे "संशोधन" होय श्री. पावलाय यांच्यामते सामाजिक संशोधन ही संज्ञा "समाज आणि संशोधन" या दोन क्षेत्रांशी निगडीत आहे. क्रमबध्दता, अंतर्गत परस्पर संबंध, सामान्य स्पष्टीकरण आणि नैसर्गिक नियम यांच्याद्वारे नविन तथ्थे शेधून काढण्याची किंवा जुन्या तथ्थ्यांची पडताळणी घेण्यासाठी सामाजिक संशोघन ही एक वैज्ञानिक अधिष्ठान असणारी प्रक्रिया पध्दती आहे. थोडक्यात असे म्हणू की, सामाजिक तथ्थे, व्यवहार, घटक, कार्यकारण -संबंध, नियम, सिध्दांत आणि नवीन ज्ञान यांच्याशी संबंधीत असणाऱ्या सर्व प्रकारच्या संशोधनांना सामाजिक संशोधन असे म्हणतात.

**विषयप्रतिपादन :-**

सामाजिक संशोधनाचे स्वरूप उद्देश आणि संशोधनाचा दृष्टीकोन यावर आधारीत सामाजिक संशोधनाचे विविध प्रकार पुढील प्रमाणे.

१) मौलिक, शुध्द, सैद्धांतिक संशोधन (Basic or pure Research)

२) व्यावहारिक , क्रियात्मक संशोधन (Practical of applied Research)

**व्यावहारिक संशोधन (Applied Research ) :**

जेव्हा संशोधनचा उद्देश व्यावहारिक उपयोगासाठी ज्ञान हाच असतो तेव्हा त्यास व्यावहारिक संशोधन म्हणतात. रॉबर्टलिंड (Robert Lind) यांनी व्यावहारिक संशोधनांचा पुरस्कार केला. या संशोधनाचा संशोधनाअंतर्गत सामाजिक नियोजन, सामाजिक कायदे,धर्म, शिक्षण, आरोग्य, रक्षणासंबंधीचे नियम इ. विषयाचा समावेश होतो. कार्यकारण संशोधनाचे कार्य हे केवळ व्यावहारिक जीवनाशी संबंधीत विषय आणि समस्याबाबत यथार्थ ज्ञान मिळविणे आहे. स्टाउफर (Stouffer) यांनी सामाजिक जीवनात व्यावहारिक संशोधनाचे



असेल तर त्याला व्यावहारिक बाजूवर अधिक भर दयावा लागेल. या वैज्ञानिक पध्दतीचा आणि तंत्राचा उपयोग शुध्द संशोधनात केला जातो. अशाच स्वरूपाचा विचार श्रीमती . पॉलीन यंग (Pauline Young) यांनी संशोधनाचा एक निश्चत संबंध लोकांच्या प्राथमिक आणि कल्याणाशी असतो. (This search for knowledge has a definite relation to peoples basic needs and welfare)"

१)सामाजिक तथ्थ समाजाकरीता कशा प्रकारे उपयोगी आहे यासंबंधी विश्वासनीय प्रमाणांना प्रस्तूत करणे. २) अशा प्रकारच्या तंत्राचा उपयोग व विकास करणे हे मौलिक संशोधनासाठी उपयोगी आहे. ३) तथ्थ आणि विचारांना प्रस्तुत करणे की ज्यामूळे निष्कर्षीकरण आणि सामान्यीकरणाच्या प्रक्रियेस प्रोत्साहन मिळू शकेल.

"ऑर्थर लेविस व रॉबर्टलिंड " यांनी संपादीत ज्ञानाचा सामाजिक कल्याणासाठी उपयोग करणे हा या संशोधन पध्दतीचा उद्देश आहे. समस्या निर्मितीला प्रतिबंध घालणे व त्यावर निर्माण झालेल्या उपाययोजना सूचविणे यावर भर दिला. सामाजिक अधिनियम, नियोजन, स्वास्थ, शिक्षण, धर्म, न्याय, मनोरंजन इ. क्षेत्रात क्रियाभिमूख संशोधन पध्दतीचा उपयोग होतो. ज्ञान हे व्यवहारोपयोगी असावे असा आग्रह आहे. क्रियाभिमूख संशोधनाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी असतो. प्रत्यक्ष जीवनात काय ? कसे ? या प्रकारच्या संशोधन पध्दतीद्वारे मिळविली जातात.

**संशोधनाचे महत्त्व :-**

सामाजिक संशोधन हे सामाजिक घटनाचे अध्ययन आहे. त्यासाठी समाजाचा विकास होण्यासाठी त्यांची अत्यंत मदत होते. सत्याचे संशोधन केल्यामूळे ज्ञानप्राप्ती होते आणि त्याचा समाजाला अत्यंत उपयोग होतो. संशोधनामूळे समाजातील दृष्टप्रवृत्तीची आणि त्यांच्या दुष्परिणामांची जाणीव होते. संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. सामाजिक प्रक्रिया, वर्तनप्रक्रिया सामाजिक घटना व सामाजिक व्यवस्थांमधील साम्य आणि भेद यांचा शोध लावण्याचा आणि त्यांचे स्पष्टीकरण करण्याचा सामाजिक संशोधकाकडून सातत्याने प्रयत्न होत असतो. सामाजिक संशोधनाची उपयुक्तता सांगतांना

Assistant Professor
Shivaji College Hingoli.
Tq.& Dist. Hingoli.(MS.)

85

सामाजिक संशोधनाचा मुख्य उद्येश एखादया सामाजिक समस्येबाबत वस्तूनिष्ठ ज्ञान प्राप्त करणे हाच असतो. सामाजिक संशोधनामूळे जून्या रूढीवादी, परंपरा, लोकभ्रम, अंधश्रध्दा, संकूचित विचारसरणींना आळा बसतो व त्यासंबंधीची वास्तव भूमिका नविन ज्ञानाच्या आधारे तयार होते. अशा संशोधनामूळे समाजाला बरीच मदत होते वैज्ञानिक ज्ञानाचा अनुभव मिळतो. यातून समाजाची सामाजिक प्रगती साधता येते. सामाजिक जागृती करण्याचे कार्य, प्रयत्न संशोधन सातत्याने करीत असतात.

**निष्कर्ष :-**

१) सामाजिक संशोधनाचा संबंध केवळ संशोधनापूरता नसून त्याचा उपयोग व्यावहारिक, प्रशासकीय समस्या सोडविण्यासाठी केला जातो.

२) उद्देश आणि सिध्दांताचे व्यक्ती समुहावर काय परिणाम होतील याचाही अभ्यास या संशोधनात केला जातो. अनेक विषयप्रवाहाशी संबंध असून व्यापक समस्येचे अध्ययन केले जाते.

३) व्यावहारिक, क्रियाभिमुख संशोधनाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी असतो. प्रत्यक्ष जीवनात काय ? कसे ? का ? या प्रश्नांची उत्तरे प्रस्तुत संशोधनपध्दतीद्वारे मिळविता येतात.

## संदर्भ सूची :-

१) सामाजिक संशोधन पध्दती - भांडारकर / वेद्य

२) सामाजिक संशोधन पध्दती - बोधनकर / मृणाल (साईनाथ प्रकाशन, नागपूर )

३) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ.प्रदिप आगलावे (साईनाथ प्रकाशन, नागपूर )

४) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ.बी.एम.कज्हाडे (पंचगंगा पकाशन,कोल्हापूर )

५) माहिती तंत्रज्ञान (MKCL- Ms.CIT ) महाराष्ट्र शासन

६) समाजशास्त्र ११ वी क्रमीक पुस्तक - महाराष्ट्र राज्य मा.व उ.मा.शिक्षण मंडळ पूणे )

SHIVAJI COLLEGE • HINGOLI
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



## प्रकरण ८

# उच्च शिक्षणातील संशोधनाचे स्वयं मुल्यमापन

**डॉ. सुभाष एन. सातव**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

**प्रस्तावना :**

प्राचीन काळी अनेक शतकापर्यंत भारतात शिक्षण ही खाजगी संस्थाची जबाबदारी आहे असे मानले जात होते. शासकीय संस्थामार्फत शिक्षण देण्याच्या सोयी कुठही उपलब्ध नव्हत्या. राजा अशोकाच्या काळापासून बुध्दांच्या आश्रमाचे रुपांतर उच्च शिक्षणाचे केंद्रात झाले. नालंदा येथे बौध्द आश्रमाचे तक्षशिला बनारस नालंदा, वल्लभी, विक्रमशीला ही उच्च शिक्षण देणारी केंद्रे प्रसिध्दीस आली. नालंदा हे तर जागतिक किर्तीचे शिक्षण केंद्र होते. विजापूर जिल्हातील सालोटगी येथील देवालय १० व्या व ११ व्या शतकातील हिंदुचे प्रसिध्द उच्च शिक्षण केंद्र होते. मोगलांच्या आक्रमणामुळे भारतातील उच्च शिक्षण केंद्रे नामशेष झाली. ब्रिटीशकाळात आजच्या विद्यापीठीय शिक्षणाच्या संकल्पनेनुसार विद्यापीठीय उच्चशिक्षणाचा पाया घातला गेला.

कोणत्याही राष्ट्राच्या विकास हा त्या देशातील उच्च शिक्षण व उच्चशिक्षणा अंतर्गत संशोधनावर असतो. आज संशोधन हे शिक्षणाचे मुलभूत महत्वाचे अंग मानले जाते. शिक्षण क्षेत्रात संशोधनाला महत्वाचे स्थान आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक समस्येचे सोडवणूक ही संशोधनातून शास्त्रीय पध्दतीने करण्यावर भर दिला जात आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी डॉ. सॅम पित्रोदा यांच्या